# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 03/02/2020 (सोमवार)
# (सकाळ)

---

## घरफोडी

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 2 कि.मी अंतरावर टेकाडी कॉलनी क्वॉटर क्र. बी/3/94 येथे दिनांक 27/10/2019 चे 12:00 वा. ते 14:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– कुमार बच्चा सिंग, वय 55 वर्ष, रा. न्यु टेकाडी कॉलनी हे घराला कुलूप बाहेर गावी बंगलोरला गेले होते. दरम्यान फिर्यादींच्या घराच्या दाराचा अज्ञात आरोपीने कुलूप तोडून घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने घरातील बेडरूम मध्ये असलेली लोखंडी कपाटामध्ये ठेवलेले सोन्या– चांदीचे दागिने कि. 16,000/–रू. व नगदी 5,000/–रू. असा एकुण कि. 21,000/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार पाली 9011038677 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर पी.डब्लु.एस कॉलेज पुढे थोराने लेआउट, कळमेश्वर येथे दिनांक 02/02/2020 चे 12:30 वा. ते 18:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– पंकज प्रकाशराव होनाडे, वय 43 वर्ष, रा. पी.डब्लु.एस कॉलेज पुढे थोराने लेआउट, कळमेश्वर हे परिवारासह घराला कुलूप बाहेर गावी गेले होते. दरम्यान फिर्यादींच्या घराच्या समोरील दाराचा अज्ञात आरोपीने कुलूप तोडून घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने घरातील लोखंडी कपाटामध्ये ठेवलेले 12 ग्रॅम सोन्याचा ब्रासलेट कि. 40,000/–रू. चा मुद्देमाल चोरी केले. तसेच अज्ञात आरोपीने फिर्यादींच्या शेजारी राहणारे मनोज कृष्णाजी पुरी यांचे घरी सुद्धा चोरी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार निरंजन गवई 9860889550 हे करीत आहे.

3) पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत 1 कि.मी अंतरावर गडकरी चौक सावनेर येथे दिनांक 01/02/2020 ते दिनांक 02/02/2020 चे 08:30 वा. पुर्वी फिर्यादी नामे— प्रेम विश्वनाथ गजभीये, वय 28 वर्ष, रा. जयस्वाल लेआउट सावनेर यांचे मोबाईल शॉपीचे दुकानाचे शटरचा कुलूप अज्ञात आरोपीने तोडून घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने दुकानामधील ग्राहकाचे दुरूस्ती करीता टाकलेले जुने मोबाईल कि. 22,500/—रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र यादव हे करीत आहे.

4) पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत 2 कि.मी अंतरावर कावरापेठ पाण्याच्या टाकीजवळ, उमरेड येथे दिनांक 01/02/2020 ते दिनांक 02/02/2020 चे 22:00 वा. ते 05:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— जगदीश पांडुरंग ठाकरे, वय 21 वर्ष, रा. कावरापेठ पाण्याच्या टाकीजवळ उमरेड यांनी घराचे मागील दारवाजा नसलेल्या दाराला पडदा लावुन परिवारासह झोपले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने उघडया दारातुन घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले नगदी 25,000/—रू. व भिंतीवर लटकलेले फिर्यादी व भवाच्या पॅन्टच्या खिश्यातुन 11,000/—रू. व 1,300/—रू. असा एकुण कि. 37,300/—रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार संजय कुलकर्णी 9422818062 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर